शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक एप्रिल २०१८
अंक क्र. ३५
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 47 अंक : 14 कोल्हापूर ता. 22 मे 2018 किंमत 2 रुपये Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS

## १६ वे भिडे कुल संमेलन - गुहागर, २०१८

निसर्गरम्य गुहागरात, व्याडेश्वरक्षेत्री आणि ते सुद्धा दुर्गादेवी मंदिराच्या प्रांगणात भिडे कुलसंमेलन म्हणजे आम्हा शहरवासियांना पर्वणीच. मोजकी ५-६ घरे असूनसुद्धा गुहागरवासियांनी संमेलनासाठी चांगली तयारी दाखवली. खासकरून श्री. गणेश भिडे व श्री. सुमंत भिडे यांनी पुढाकार घेऊन, संमेलनाचे खूप छान आयोजन केले व संमेलनाला येणाऱ्या सर्व मंडळींची खूप छान व्यवस्था केली. दुर्गादेवी मंदिराचे मंगलमय प्रांगण व त्यात उभारलेला लाल सभामंडप अतिशय प्रसन्न होते. मंदिराच्या परिसरातच राहण्याची व भोजनाची व्यवस्था होती.

प्रथेप्रमाणे अध्यक्षांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली व श्री. अंकुश भिडे ह्यांनी सादर केलेल्या शांतीपाठामुळे वातावरण अगदी मंगलमय झाले. संमेलनाचे अध्यक्ष श्री. मनोहरकाका भिडे यांचे स्वागत झाल्यावर 'प्रतिष्ठानची वाटचाल', तसेच 'गोवा ते गुहागर' असे प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेणारे कार्यक्रम सादर झाले. अध्यक्षांच्या हस्ते 'आम्ही भिडे' अंकाचे प्रकाशन झाले. त्याचप्रमाणे श्री. अतुल भिडे, ठाणे यांनी संगणकीय अक्षरलेखन केलेल्या 'श्रीव्याडेश्वर पंचायतन उपासना' ह्या पोथीचे प्रकाशन होऊन श्री. अतुल यांचेकडून विनामूल्य वितरित करण्यात आले. श्री. अमोल भिडे यांनी सादर केलेला 'दृष्टी पलीकडील सृष्टी' या जादूच्या प्रयोगांवर आधारित कार्यक्रम पाहताना अबालवृद्ध रंगून गेले, तर श्री. श्रीनिवास पेंडसे यांनी भगवान परशुरामांच्या तेजस्वी चरित्रातील काही प्रसंग रसिकांसमोर असे उभे केले की सर्व उपस्थित स्तंभित होऊन गेले. असा विविधरंगी दिवस संपताना मेजवानी आणि नंतर कॅम्प फायर तर होतेच.

दुसऱ्या दिवशी सुरुवात झाली दुर्गादेवी मंदिर ते व्याडेश्वर मंदिर अशा पायी दिंडीने. सर्व कुलबंधू आणि भगिनींनी दोन्ही देवस्थानचे दर्शन घेतले व सर्व भिडे कुलावर आपली कृपादृष्टी असावी अशी प्रार्थना केली. चहा-नाष्टा झाल्यावर प्रतिष्ठानतर्फे विविध वर्गात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना तसेच अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भिडे बंधुभगिनींना पुरस्कार देण्यात आले. श्री. प्रभाकरकाकांना आदर्श कार्यकर्ता पुरस्कार देताना सर्वांनाच अतिशय आनंद होत होता. भिडे कुलवृत्ताच्या प्रमुख संपादकाचे काम पाहताना त्यांनी 'निष्काम कर्मरति योगही खंडीला ना' या भावनेने कार्य केले व आपणा सर्वांना कुलवृत्ताच्या दुसऱ्या आवृत्तीची भेट दिली.




गुहागर संमेलनामध्ये प्रथमच सर्व भिडे कुलोत्पन्नांनी दिंडी काढली होती. त्यासाठी उत्तम प्रतिसाद मिळाला.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. कुमारकाका व संमेलन अध्यक्ष श्री. मनोहरकाका भिडे यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर झालेले विविधरंगी करमणुकीचे कार्यक्रम म्हणजे नृत्य, गायन, एकपात्री आणि नाट्य वाचनाची भरघोस मेजवानी. माहेरचा सन्मान म्हणजे श्रीमती शशीताईंनी भिडे माहेरवाशिणींना माहेरीच आपले कौतुक होत आहे असा आनंद दिला.

साधारण २५० बंधू आणि भगिनींनी संमेलनाला उपस्थिती दाखवली, पण कुणाची गैरसोय झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. रविवारी दुपारी मसालेभात आणि जिलेबीवर सर्वांनीच ताव मारला.

संमेलनाचा समारोप होताना खुले चर्चासत्र झाले. पुढील संमेलनस्थळाबद्दल चर्चा झाली, पण निर्णय झाला नाही. शेवटी आपण सर्वच भिडे असल्याने सर्व बाबतीत एकमत होईलच असे नाही. काही जणांनी प्रतिष्ठानसाठी काहीतरी सकारात्मक कार्यक्रम करायची इच्छा दर्शविली. पण प्रतिष्ठानकडून सांगण्यात आले तर करू असा विचार मांडण्यात आला. कुठलंही चांगलं काम करण्यासाठी किंवा भिडे बंधू-भगिनी व माहेरवाशिणींना एकत्र आणून काही कार्यक्रम करण्यासाठी कुणाच्या परवानगीची गरज आहे असे मला वाटत नाही. नाडणचे भिडे बंधू-भगिनी आणि माहेरवाशिणी दरवर्षी स्नेहसंमेलन करतात हे उदाहरणादाखल सांगता येईल. हा अतिशय कौतुकास्पद उपक्रम आहे. कुलसंमेलनामध्ये तरुणांची उपस्थिती हा एक नेहमीच चर्चेचा विषय असतो. काही चित्पावन कुलसंमेलनात तरुणांचा सहभाग वाढावा यासाठी काही उपक्रम केले जातात, (पान २, कॉलम २)

## भिडे कुलबंधू भगिनी आणि माहेरवाशिणींना आवाहन

भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती सॉफ्टवेअरमध्ये करण्याचा मानस आहे, त्यासाठी तुमच्या सगळ्यांच्या मदतीची आवश्यकता आहे. सध्या प्राथमिक स्टेजमध्ये दुसऱ्या कुलवृत्तातील ७०० ते ७५० पाने आपल्याला इंग्रजीमध्ये तयार करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांना एक सॅम्पल एक्सेल पान देण्यात येईल. त्याप्रमाणे यादी तयार करावी लागणार आहे. तरी आपण मदतीला तयार असल्यास आपले नांव, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी खालील इमेल आयडीवर कळवावा. shantubhide@gmail.com एक पान सॉफ्टवेरमध्ये करण्यासाठी फक्त १० मिनीटे वेळ लागणार आहे. तेंव्हा या कामासाठी किमान १०० कुलोत्पन्नांनी मदत केली तर आपण सहजगत्या हे काम लावकरात लवकर पूर्ण करू शकू. तेंव्हा थोडासा खारीचा वाटा आपण भिड्यांनी द्यावा, अशी विनंती करीत आहेत.

संपर्कासाठी श्री. शंतनू भिडे, पुणे मो. ७५८८३२१२८९

**श्री. दिलीप भिडे,** विश्वस्त सचिव, भिडे प्रतिष्ठान


आम्ही भिडे अंक ३५ वा

| | |
|---|---|
| संपादक : | श्री. शशिकुमार केशव भिडे |
| कार्यकारी संपादक : | ले. क. सुनिल भिडे |
| संपादक मंडळ : | श्री. दिलीप भिडे, श्री. प्रभाकर भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. विनायक भिडे |
| सल्लागार मंडळ : | श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, के. मो. भिडे, श्रीमती शशिताई घुले, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे |
| अक्षर जुळणी : | सौ. विनीता डबीर |


### नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

९२, शुक्रवार पेठ येथील कार्यालय तात्पुरते बंद आहे. त्याठिकाणी पत्रव्यवहार करु नये. त्या ऐवजी पत्रव्यवहारासाठी पत्ता या ठिकाणी संपर्क/पत्रव्यवहार करावा, ही नम्र विनंती आहे.


पत्रव्यवहारासाठी पत्ता

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४


**सर्व जाहिरातदार, बॅनर्सदार, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**

# १६ वे भिडे कुल संमेलन

तसेच कार्यक्रमांमध्ये तरुणांसाठी वेळ निर्धारित केली जाते. गोवा येथे झालेल्या कुलसंमेलनात तरुणांचा खूप सहभाग होता व त्यांनी कार्यक्रमांचे खूप छान आयोजन केले. तरी संमेलनात उपस्थितांचे सरासरी वय हे ५५ असते हेच खरे. एरवी नवीन वर्षाच्या आगमनाची तयारी दोन महिने आधीपासून करणारी तरुणाई कुलसंमेलनाला येत नसतील तर याला ज्येष्ठ मंडळींचं तरुणांशी होणारं संभाषण हे योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. थोडेसे पुढे जाऊन मी असे म्हणेन की, भिडे तरुण मंडळींनी स्वतः आवडीने पुढे येऊन आपल्याला आवडेल ते काम स्वीकारून भिडे कुटुंबीयांच्या ह्या कार्याला साथ दिली पाहिजे. आपले कुलाचार, रितीरिवाज, ज्येष्ठांचा मान ठेवायच्या आपल्या पद्धतींवर पाश्चात्य विचारांची सावली पडल्याचे दिसून येते. अजून तीन पिढ्यांनंतर, 'बाबा परशुराम म्हणजे कोण ?' असा प्रश्न मुलाने विचारल्यावर त्याच्या वडिलांनी गुगल सर्च केले तर त्यात नवल वाटायला नको. आपल्या पूर्वजांचे विचार तरुणाईपर्यंत पोचवणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे आणि त्या उद्देशाने कुलसंमेलनाला तरुणांची उपस्थिती वाढविणे अतिशय महत्त्वाचे आहे.

काही उदार भिडे मंडळींनी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक निधी तसेच वैद्यकीय मदत निधी म्हणून कायमस्वरूपी मदत निधी ठेव प्रतिष्ठानकडे ठेवली आहे. पण ही ठेव सर्व गरजूंना मदत करण्यासाठी पुरेशी आहे का ? आज विविध समाजाच्या संस्था त्यांच्या सभासदांना विनामूल्य शिक्षण व खर्चिक शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध करून देताना आपण बघतो. मग आपणसुद्धा आपल्या सभासदांना अधिक मदत मिळण्यासाठी त्या निधीमध्ये वृद्धी करून अधिक मदत करू शकतो.

आज संगणकाद्वारे जग जरी ग्लोबल विलेज झाले असले तरी, आपण आपल्या मूळ विचारांपासून दूर होतोय असा भास निर्माण झालाय. हा भास दूर करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन भिडे कुल समृद्ध करण्यासाठी सकारात्मक कार्यक्रम करणे हाच उपाय आहे. आणि निधी संकलन म्हणाल तर एक हजार सभासदांनी रोज एक रुपया जरी मागे ठेवला तरी वर्षाला ३ लाख ६५ हजार निधी जमतो. अठरा पुराणांचे सार महर्षी व्यासांनी एका वाक्यात सांगितले. 'पुण्य पर उपकार, पाप ते पर पीडा.' चला मग परोपकार आपण आपल्या भिडे कुल नावाच्या घरापासूनच सुरू करूया. एकमेका सहाय्य करू, अवघे होऊ समर्थ !

शब्दांकन : राजेंद्र भिडे, दादर

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. १) श्री. अनंत महादेव भिडे, पुणे, २) श्री. श्रीकृष्ण गंगाधर भिडे, पुणे, ३) श्रीमती मेजर वासंतीताई मराठे, सांगली, ४) श्री. जयंतराव भिडे, ठाणे, ५) श्रीमती मंगला भिडे, पुणे, ६) श्री. सदानंद काशिनाथ भिडे, सातारा. ७) श्री. वसंत मोरेश्वर भिडे, पुणे, ८) श्रीमती लक्ष्मी अनंत भिडे पुणे

व्यक्तिगत आर्थिक स्थैयाचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### एप्रिल

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा | १ |
| २. | सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग | २ |
| ४. | सौ. पूर्वा प्रमोद देवधर, दादर | २ |
| ५. | श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण | २ |
| ६. | सौ. अलका केशव भिडे, पुणे | ६ |
| ७. | श्री. पुष्कर प्रसन्न भिडे, पुणे | ६ |
| ८. | श्री. अभिषेक सुरेंद्र भिडे, इंदौर | १० |
| ९. | सौ. पौर्णिमा धनंजय भिड, पुणे | १३ |
| १०. | कु. भूषण गजानन भिडे, अलिबाग | १५ |
| ११. | श्री. केशव मोरेश्वर भिडे, पुणे | १६ |
| १२. | श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली | १७ |
| १३. | श्री. संजय शंकर भिडे, मुंबई | १७ |
| १४. | श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे | १८ |
| १५. | श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे | २० |
| १६. | ॲड. अविनाश ज. भिडे, नाशिक | २१ |
| १७. | सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा | २३ |
| १८. | श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे | २४ |
| १९. | चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी | २४ |
| २०. | श्री. धनंजय केशव भिडे, पुणे | २४ |
| २१. | ॲड. अविनाश ज. भिडे, नाशिक | २४ |
| २२. | सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे | २५ |
| २३. | श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे | २६ |
| २४. | श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली | २७ |
| २५. | कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| २६. | कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| २७. | सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे | २८ |
| २८. | सौ. मृणाल प्रकाश भिडे, माभळे | २९ |

### मे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे | ३ |
| २. | सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली | ३ |
| ३. | सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे | ५ |
| ४. | सौ. स्नेहा नितीन भिडे, पुणे | ५ |
| ५. | श्री. आशिष अनिल भिडे, भोपाळ | ६ |
| ६. | सौ. मिताली मंदार भिडे, रत्नागिरी | ९ |
| ७. | कु. मृण्मय मंदार भिडे, रत्नागिरी | १० |
| ८. | श्री. शरद हरी भिडे, पुणे | ११ |
| ९. | श्री. राजेश शरद भिडे, पुणे | ११ |
| १०. | सौ. कल्याणी विनोद भिडे, औरंगाबाद | ११ |
| ११. | श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर | १३ |
| १२. | सौ. पूनम अमित भिडे, पुणे | १३ |
| १३. | कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे | १३ |
| १४. | श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे | १७ |
| १५. | सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल | १९ |
| १६. | श्री. मंदार उदय भिडे, देवरूख | १९ |
| १७. | सौ. माया सुनिल भिडे, पुणे | १९ |
| १८. | सौ. उज्वला यशवंत भिडे, औरंगाबाद | १९ |
| १९. | श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे | २२ |
| २०. | कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई | २३ |
| २१. | कु. ओम चंदन भिडे, पुणे | २४ |
| २२. | सौ. अभिलाषा रोहन भिडे | २४ |
| २३. | सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली | २५ |
| २४. | श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे | २६ |
| २५. | कु. रिचा विक्रम भिडे, हैद्राबाद | २६ |
| २६. | कु. अपूर्व राजेंद्र भिडे, डोंबिवली | २७ |
| २७. | सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप | २७ |
| २८. | चि. भार्गवी विक्रांत भिडे, पुणे | २८ |
| ३०. | श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव | २९ |
| ३१. | सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे | २९ |
| ३२. | श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे | २९ |
| ३३. | श्री. विनयकुमार भिडे, बेंगलोर | २९ |
| ३४. | नीलकमल फडके, पुणे | २९ |
| ३५. | श्री. विजयसिंह विष्णू भिडे, नाशिक | ३१ |

### जून

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे | १ |
| २. | सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. अमोल मुकुंद भिडे, सांगली | २ |
| ४. | कु. अमृता चंदन भिडे, पुणे | ५ |
| ५. | सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे | ६ |
| ६. | सौ. सुनीता विजय भिडे, ठाणे | ८ |
| ७. | सौ. आदिती अविनाश भिडे, नाशिक | ९ |
| ८. | सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे | ९ |
| ९. | सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे | १२ |
| १०. | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | १२ |
| ११. | सौ. गार्गी आदित्य जोशी, पनवेल | १३ |
| १२. | श्रीमती कमल बाळकृष्ण देवधर, गिरगांव | १४ |
| १३. | सौ. संगिता सतिश भिडे, नाशिक | १८ |
| १४. | कु. अश्विनी विजय भिडे, ठाणे | १९ |
| १५. | सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे | २० |
| १६. | श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव | २० |
| १७. | सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक | २१ |
| १८. | श्री. प्रभाकर नारायण भिडे, माभळे | २१ |
| १९. | क्षितीजा गणेश भिडे, पुणे | २१ |
| २०. | सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे | २३ |
| २१. | सौ. नीला कुमार भिडे, पुणे | २३ |
| २२. | श्री. प्रतीक संतोष भिडे, ठाणे | २६ |
| २३. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| २४. | श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल | २९ |
| २५. | सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर | २९ |

# कालबाह्य पत्रमैत्रिण

- सुमती वा. भिडे, पुणे
०२०-२५४४११६१

आपल्या घरातून आता पत्रलेखन हा प्रकार कालबाह्यच झाला आहे. त्याची जागा आता फेसबुक, मोबाईल, संगणक, मेल ह्यांनी घेतली आहे. कॉम्प्युटरने तर किमयाच केलीआहे. ई-मेल करा - डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट कॉम, मेसेज फीड करा, डोळ्यांचे पाते लवते न लवते तोच मेसेज पोचल्याचे कॉम्प्युटरवर येते. सध्याच्या धावपळीच्या जगात हे माध्यम सर्वांना फारच सोयीचे झाले आहे. मोबाईलवरून जगात कुठेही जिव्हाळ्याच्या व्यक्तीशी बोलता येते. आता मुलांना पत्र तरी लिहिता येईल का असे वाटते. आमच्या मागच्या पिढीपर्यंत पत्रांना आयुष्यात फारच महत्त्वाचे स्थान होते. पत्र लिहिणे ही एक कलाच समजली जाई.

पत्र ह्या शब्दाची व्युत्पत्ती मोठी मजेशीर आहे. आदिमानव जेव्हा प्रथम आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी लिहू लागला तेव्हा प्रथम मानवाने जाड भुर्जपत्रावर लिहिणे सुरू केले. पत्र म्हणजे पान, अशी पत्र ह्या शब्दाची व्युत्पत्ती आहे. अजूनही आपण तुलसीपत्र, बेलपत्र असे म्हणतो. त्याचेच पुढे मराठी रुपांतर पान असे झाले. वर्तमानपत्राचे पान, वहीचे एक पान असे.

पूर्वी लग्न, मुंजी, बारसे ह्यांच्या आमंत्रणासाठी परगावी २-२ महिने आधी निमंत्रण पत्रे पाठवित असत. पुराणकाळातही पत्रांचे उल्लेख सापडतात. दमयंतीने नळ राजास हंसाकरवी पाठविलेले (केवढी रसिक ना ?) प्रेमपत्र किंवा रुक्मिणीने श्रीकृष्णास ब्राह्मणाकरवी पाठविलेले प्रेमपत्र.

छत्रपती शिवाजीराजे यांनी राज्यकारभारासाठी पाठविलेली कितीतरी पत्रे उपलब्ध आहेत. बाळाजी आवजी ह्या कोकणात राहणाऱ्या मुलाने मोत्यांच्या अक्षरात शिवाजीराजांना पत्र लिहिले. स्वराज्याची सेवा करण्याची इच्छा आहे असे. राजे गुणग्राही, माणूस पारखी. त्यामुळे राज्यास बाळाजी आवजी आणि त्यानंतर त्यांचे पुत्र खंडोजी असे स्वामिनिष्ठ सेवक मिळाले. निव्वळ छोट्याशा पत्रामुळे.

मुत्सद्दी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी राघोबादादा पेशवे ह्यांना लिहिलेले असेच एक महत्त्वाचे पत्र ! राघोबादादा त्यांचे राज्यावर हल्ला करण्यास गेले तेव्हाचे. 'आपण मातब्बर. अटकेस झेंडा फणकविणारे, आपण जिंकल्यास नवल नाही. पण हरल्यास बाईकडून हरल्याची मानहानी टळणार नाही.' राघोबादादा परत गेले.

अशी अनेक पत्रे बखरींमध्ये पेशवे दरबारातील दफ्तरांतून उपलब्ध आहेत. पेशवेकालीन आणखी एक महत्त्वाचे पत्र म्हणजे थोरले बाजीराव पेशवे ह्यांना छत्रसाल राजांनी लिहिलेले पत्र ! 'जसे गजेंद्रास मगरीपासून सोडविण्यास श्रीविष्णू धावून आले, त्याप्रमाणे आपण आमच्यावर हल्ला करणाऱ्यांपासून वाचविण्यास यावे.' अत्यंत शूर, एकही युद्ध न हरलेले बाजीराव मदतीसाठी धावून गेले.

या नंतरच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील अगणित पत्रे उपलब्ध आहेत. त्यातील देशप्रेमाने ओथंबलेले हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे पत्र ! अंदमानमधील तुरुंगातून पत्नीला लिहिलेले पत्र, 'चिमणी-कावळ्याप्रमाणे घर सगळेच बांधतात. आपले ध्येय वेगळे आहे. *देशासाठी घराची आहुती* द्यावी लागेल.'

आणखी महत्त्वाची पत्रे म्हणजे आनंदी-गोपाळ ह्या दाम्पत्याचे पत्रं ! किंवा नेहरू-इंदिराजी यांची पत्रं ! मग पत्रांनी सिनेमातही प्रवेश केला. 'खत लिख दो सावरिया को' असे एखादी अनाडी स्त्री म्हणते किंवा 'ये मेरा प्रेमपत्र पढकर' म्हणून कुणी प्रेमिकेला आळवतो. व्यक्तिगत जीवनात जिव्हाळ्याच्या माणसाच्या पत्रांना आपल्या जीवनात वेगळेच स्थान असते. माझ्याकडे अशा पत्रांचा खजिनाच आहे. काही पत्रं फारच बोलकी असतात. काही पत्रांतून जिव्हाळा ओथंबलेला असतो. तर काही पत्रांतून तुमच्या छोट्याशा कर्तृत्वाबद्दल अभिनंदन केलेले असते. माझ्या पत्रांच्या खजिन्यातील अशी पत्रं म्हणजे माझे अनमोल धनच आहे. दूर गावी असताना मुलांची आपल्या काळजाच्या तुकड्याची पत्रं वाचताना मन भारावते.

मित्र-मैत्रिणींची पत्रं वाचताना शाळेपासून जपलेल्या स्नेहाची स्नेहभरी पत्रं वाचताना लक्षात येते की, या पत्रलेखकांपैकी कितीतरी मैत्रिणी काळाच्या पडद्याआड गेलेल्या आहेत. त्यांच्याबरोबर घालविलेले सुखद क्षण, ती लुटुपुटुची भांडणं, कट्टी-बट्टी, ते बॅडमिंटन खेळणे, स्पर्धा-नाटक बसवणे. त्यांच्या बरोबर घालविलेले सुखद क्षण आठवतात. कधी मधुर आठवणींनी डोळे हसतात तर वियोगामुळे कधी डोळे पाझरतात. असे हे कालबाह्य झालेले पत्र मैत्रीचे जिव्हाळ्याचे धागे. पण अजूनही मला कधी कधी पत्रं येतात बरं का ! माझे लेख, लघुकथा स्वीकारल्याची संपादकांची पत्रं ! क्वचित वाचकांची लेखन आवडल्याची पत्रं (हल्ली बहुतेक लेखन आवडल्याचे फोनच येतात.) शिवाय मानधनाच्या मनिआर्डरी वर्षातून दोन-तीन कथा स्पर्धेत, लेखन स्पर्धेत पारितोषिक असतेच. अशीही अजून मला पत्रं येतात आणि मी पोस्टमन यायच्या वेळी दारात त्याची वाट पाहत उभी राहते.

**निवेदन :** आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणींकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत असते. हा अंक वर्गणी न घेता विनामूल्य सर्व भिडे कुलोत्पन्नांना वितरित करीत आहोत तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी आर्थिक हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी, मदत रोख वा धनादेशाद्वारे पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावाने पाठवावे किंवा त्या खात्यामध्ये ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल.

# युवापिढी : काळाजी गरज

गुहागर येथे १६ वे भिडे कुलसंमेलन नुकतेच दिमाखात पार पडले. संमेलनाचे दुसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रामध्ये (भोजनोत्तर) कौतुक, चर्चा, सूचना, पुढील संमेलन स्थळ ठरविणे ह्या कार्यक्रमानंतर संमेलनाची सांगता झाली.

शेवटच्या सत्रामध्ये 'संमेलनामध्ये तरुणांचा सहभाग' ह्या विषयी चर्चा झाली. खरंतर संमेलनामध्ये एकत्र येणे म्हणजे भिडे कुलोत्पन्नातील मंडळींचा एकोपा व त्या एकोप्यातून त्यांचा उत्कर्ष होणे महत्त्वाचे आहे. एकोप्यातून एकमेकांना साह्य करणे व त्यांचा विकास हे ध्येय आहे. ह्यामध्ये जेष्ठ, तरुण एवढेच नव्हे तर छोट्या शिशुवर्गापासून सर्वजण सहभागी असतात. तरुणांचा अल्प सहभाग ही समस्या प्रत्येक संमेलनामध्ये आणि प्रत्येक कुलामधील आहे. हा प्रश्न नेहमी व सातत्याने भेडसावणारा आहे. मला असे वाटते की आजची युवा पिढी आपल्या उद्योगात, नोकरीत, व्यवसायात व्यस्त असते ह्याची जाणीव सर्वांनाच आहे. २५-३० वर्षांपूर्वीचे सरकारी ऑफिसप्रमाणे १० ते ५ हे दिवस संपलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून प्रतिष्ठानचे सतत काम करावे ही अपेक्षा धरणे योग्य वाटत नाही. परंतु युवा पिढीची बुद्धी, त्यांचे शिक्षण व आवड, त्यांच्याजवळ असलेल्या नवीन कल्पना याचा समाजाच्या आणि भिड्यांच्या प्रगतीसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार करायला हवा. त्याकरिता युवा पिढीला आवडत्या कामाची, क्षेत्राची, वेगवेगळ्या उपक्रमांची जबाबदारी टाकली तर ते आवडीने व स्वयंस्फूर्तीने काम करतील अशी खात्री आहे. परंतु युवा पिढीला प्रतिष्ठानमध्ये सहभागी करा असे फक्त वक्तव्य करण्यापेक्षा आपण युवा पिढीला कसे सहभागी करून घेता येईल याबाबत प्रयत्नशील राहिले पाहिजे आणि ही सुरुवात सर्वप्रथम आपल्या घरातून होणे जास्त परिणामकारक आहे असे वाटते. ह्या ठिकाणी मला कौतुकाने सांगावेसे वाटते की, श्री. शंतनु निळकंठ भिडे, पुणे ह्या तरुणाने स्वतः पुढाकार घेऊन भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती संगणकात तयार करण्यासाठी सुरुवात केली आहे आणि अनेक तरुण, ज्येष्ठ मंडळींचे सहकार्य मिळते आहे हे विशेष नमूद करावेसे वाटते. मी प्रतिष्ठानतर्फे युवापिढीला आवाहन करतो की, भिड्यांच्या उत्कर्षासाठी, विकासासाठी युवा पिढीच्या बुद्धीचा, शिक्षणाचा, कलेचा उपयोग होण्यासाठी वर्षातून, महिन्यातून, आठवड्यातून किमान एकदा तरी ह्या कार्यात सहभागी व्हा. २०१९ च्या भिडे कुल संमेलनामध्ये उपस्थितांचे सरासरी वय ५५ न राहता सरासरी वय ४० पर्यंत येईल अशी मी ह्या लेखाद्वारे अपेक्षा करतो.

– दिलीप वा. भिडे, पुणे. मो. ९६५७५४१२३६



# वीर विनायक नाबाद २५०२

शब्दांकन : दिलीप भिडे, पुणे
मो. ९६५७५४१२३६

प्रत्येक भिडे संमेलनामध्ये उत्स्फूर्तपणे पुढे येऊन निस्वार्थीपणे दरवर्षी भिडे प्रतिष्ठानची सेवा करणारे सेवाव्रती आणि स्वा. सावरकर प्रेमी म्हणजे गिरगांवचे सतीश जनार्दन भिडे. संमेलनामध्ये हे कोण असा प्रश्न कोणी विचारला तर बहुतेक प्रत्येकाचे तोंडी 'हे सावरकर भिडे' असेच शब्द येतात. स्व. दामुकाका स्वतः सावरकर प्रेमी होतेच, त्यांच्यामुळेच ह्यांची ओळख झाली. संमेलनाचे स्थळ कोणते आणि आयोजक कोण आहेत त्यांच्याशी बोलून अथवा माझ्याशी बोलून उत्स्फूर्तपणे अर्धा तास त्यांच्या कार्यक्रमासाठी आग्रहाने मागून घेतात. मला काहीही देऊ नका परंतु मला फक्त संमेलनात कार्यक्रम करण्यासाठी थोडा वेळ द्या अशी प्रेमाची आणि आग्रहाची विनंती असते. मागील गुहागर संमेलनात श्री. सतीशराव कार्यक्रमासाठी वेळ मागत होते. मी त्यांना तुमच्या कार्यक्रमासाठी कुठेही वेळ देणे शक्य नाही, असे सांगताच ह्या व्यक्तीने सांगितले, मी रात्री जेवण झाल्यावर कार्यक्रम करेन. परंतु त्यावेळी सुद्धा दुसरा कार्यक्रम नियोजन केल्यामुळे रात्रीच्या वेळी सुद्धा त्यांना वेळ देता येत नव्हता. सरतेशेवटी मी त्यांना म्हणालो की फक्त पहाटे ५ ते ५.३० अशा वेळेत तुम्हाला जमेल का ? त्यावर ह्या व्यक्तीने ती सुद्धा तयारी दाखवली. रविवारी पहाटे त्यांचा कार्यक्रम मुक्रर केला. परंतु ऐनवेळी शनिवारी रात्रीचा कार्यक्रम अचानक रद्द झाला. म्हणून तुम्ही आता तुमचा कार्यक्रम कराल का ? असे विचारण्याचे धाडस मी अगदी नाईलाजाने केले. परंतु सतीशरावांनी क्षणाची उसंत न देता माझा कार्यक्रम करायला मी तयार आहे आणि त्यांनी पहाटेचे ऐवजी रात्री तो कार्यक्रम उत्तम रितीने सादर केला. ह्यावरून त्यांचे भिडे परिवारावर किती प्रेम आहे हे दिसून आले.

श्री. सतीशराव मुळचे देवगड येथील जामसांड्याचे आहेत. ते स्वतः बी.ए., एल.एल.बी. असून सुद्धा वकीली न करता नोकरी केली. १९७५ ते ७६ पर्यंत भाभा अणु संशोधन केंद्र, मुंबई येथे टायपिस्ट म्हणून काम केले. ऑगस्ट ७६ ते २०१२ पर्यंत ते महाराष्ट्र शासनामध्ये अधिक्षक व माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. मुंबई सत्र न्यायालयातून सरकारी अभियोक्ता म्हणून निवृत्त झाले. नोकरीत असल्यापासून कलेची आवड होती. अनेक मराठी नाटके लिहिली. मराठी व संस्कृत नाटकांत विविध भूमिका केल्या. जानेवारी ८८ मध्ये ६१ व्या मराठी साहित्य संमेलनात त्यांनी सानेगुरुजींचा वेशाभिनय सादर करून शाबासकीची थाप मिळविली. फेब्रुवारी ८० मध्ये चतुरंग संस्थेकडून गीतकाराचे पारितोषिक दिवंगत संगीतकार सी.रामचंद्र यांच्या हस्ते मिळाले. सौभाग्यदान ह्या मराठी चित्रपटातही त्यांना छोटीशी भूमिका केली आहे. जून ८८ मध्ये दूरदर्शन मुंबई येथे एका कार्यक्रमामध्ये स्वतः स्वरबद्ध केलेली चालही ऐकविली आहे. १९८२ पासून आजपर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या जीवनावर आधारित आणि कवी स्व. गोपाळराव गोडसे विरचित गीतांचे भारतात व परदेशात २५०० ते वर कार्यक्रम सादर केलेले आहेत. विशेष म्हणजे ह्या सर्व कार्यक्रमांसाठी ते कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता सादर करतात. हे विशेष कौतुकास्पद आहे. नुकताच खोपोली येथे त्यांनी २५०२ प्रयोग सादर केला आहे. १८ डिसेंबर २०१३ रोजी एका दिवसात ९ कार्यक्रम आणि २७ जुलै २०१६ ह्या दिवशी एका दिवसात १० कार्यक्रम सादर केले आहेत. तसेच त्यांनी स्व. सुधीर फडके, बाळासाहेब ठाकरे, माधव मंत्री, गगनगिरी महाराज, विक्रम व विश्वास सावरकर अशा दिग्गजांसमोर आपले कार्यक्रम सादर करून शाबासकीची थाप मिळविली आहे. मंगेश पाडगांवकर म्हणतात, 'जो जो येईल त्याचे स्वागत दार कधी ना बंद, जगणे म्हणजे उधळीत जाणे हृदयातील आनंद' ह्या ओळी त्यांना सार्थ ठरतात. त्यांच्या कार्यक्रमांचे शिर्षकच 'वीर विनायक' असे असून त्यातून त्यांना मिळणारा ऐच्छिक निधी एका सैनिक शिक्षण संस्थेस दरवर्षी देतात. अशा ह्या सावरकरप्रेमी, हरहुन्नरी, गायक, गीतकार, कालाकाराचे गुण वर्णावे तेवढे कमीच आहेत. अशा ह्या चतुरस्त्र कालाकाराला भिडे परिवाराकडून मानाचा मुजरा.



सतीशरावांच्या पत्नी सौ. संघमित्रा ह्या सुद्धा उच्च न्यायालय, मुंबई येथे अधिकारी पदावर असून बी.ए., एल.एल.बी. आहेत. सामाजिक बांधिलकी सांभाळताना त्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विनामूल्य शिकवतात. चित्पावन संघ, गिरगांव येथील सामाजिक कार्यात कार्यरत आहेत. ह्यांना दोन विवाहित कन्या असून, त्या सुद्धा व्हायोलीन व संवादिनीसह सर्व वाद्ये वाजवितात. सतीशजींना मी एक दिवस प्रश्न विचारला की तुम्ही कोणत्याही वेळेला आणि कोठेही कार्यक्रमास तयार असता, त्यावर ते म्हणतात, 'माझ्या कार्यक्रमाला गर्दी नाही तर दर्दी हवेत.' संवादिनी स्वतः वाजवित असल्यामुळे साथीला तबला असला की त्यांचा कार्यक्रम यशस्वी होतो असे ते आवर्जून सांगतात. त्यांच्या ह्या निस्वार्थी कार्याला पुढे सदा यश मिळो आणि सामाजिक बांधिलकीतून जोपासलेल्या ह्या कार्याला त्यांना भरभरून शुभेच्छा !

**घटना दुरुस्ती समिती**

| | |
|---|---|
| श्री. कुमार भिडे | श्री. शशिकुमार भिडे |
| सौ. संपदा भिडे | श्री. दिलीप भिडे |

# 'नाडण भिडे कुल संमेलन - २०१७'



नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानने प्रसिद्ध केलेला 'भिडे कुलवृत्त' (वृत्तांत) या ग्रंथात पृष्ठ क्र. ३५३ ते ३५८ वर भिड्यांच्या 'नाडण वंशाची' पिढी १ ते ६ ची माहिती दिली आहे. नाडण हे देवगड तालुका जि. रत्नागिरी (आताचे सिंधुदुर्ग) येथील मूळगाव. तेथे आजही श्री. सतीश पांडुरंग भिडे व सौ. संपदा सतीश भिडे हे माझे सख्खे चुलत बंधू स्थायिक आहेत.

या 'नाडण वंशाच्या' पिढी ५ ते ७ चे सदस्य गेली अनेक वर्षे वर्षातून किमान २ दिवस एकत्र येऊन हे कुल संमेलन साजरे करतात. यंदाचे संमेलन कोल्हापूर येथील श्री कात्यायनी मंदिर रोड वरील 'आमराई - ह्यूमा एग्रो टुरिझम' येथे दि. २३ व २४ डिसेंबर २०१७ रोजी ८९ अबालवृद्ध सदस्यांचे उपस्थितीत संपन्न झाले.

पाचव्या पिढीतील भावंडांत श्री. यशवंत रामचंद्र उर्फ बापूसाहेब भिडे हल्ली मुक्काम औरंगाबाद त्यांच्या दोन बहिणी रंगू उर्फ सुनंदा नागेशराव पाटील, रा. कोल्हापूर व पुष्पा उर्फ सौ. वैदेही रामचंद्र जोशी, रा. ठाणे यांची उपस्थिती दीपस्तंभासारखी मार्गदर्शक व पुढील पिढ्यांनाही उत्साहित करणारी होती.

यशस्वी आयोजनाचं शिवधनुष्य भिड्यांची सर्वात लहान माहेरवाशीण सौ. वर्षा भिडे गाडगीळ व सर्वात ज्येष्ठ माहेरवाशीण रंगूताई नागेशराव पाटील हिने तिचा मुलगा श्री. माधवराव पाटील व नातू श्री. श्रीकांत गबाळे यांचे मार्फत लीलया उचलले व समर्थपणे पळवले ! समस्त पाटील, गबाळे व गाडगीळ परिवारांना मनस्वी धन्यवाद ! भिड्यांच्या संमेलनात कोल्हापूर निवासी सौ. व श्री. आबासाहेब गाडगीळ या व्याह्यांनी समारोप प्रसंगी लावलेली हजेरी म्हणजे सर्वांसाठी दुग्धशर्करा योगच होता. भावंडे, सुना, नातवंडे, पतवंडे या सर्वांचा हा मेळा संपूच नये असे वाटत होते. उत्तम परिसर, खानपान व निवासाची चोख व्यवस्था यामुळे अबालवृद्ध साऱ्यांनीच खूप धमाल केली. जुन्या आठवणी, नवे परिचय, माहितीचे आदानप्रदान, गाणी, गप्पा, खेळ गिरीभ्रमण, श्रीकात्यायनी देवीचे प्रातःकाळी झालेले विलोभनीय दर्शन या साऱ्या गोष्टी उराशी साठवत प्रत्येकाला पुढील प्रवासासाठी काढता पाय घेणे क्रमप्राप्त होते. पुढील वर्षी पुन्हा भेटूच असा संकल्प करून अखेर या संमेलनाचे सूप वाजले. पुढीलवर्षी (२०१८) भिडे नाडण कुल संमेलन औरंगाबाद येथे होईल असे विनोद भिडे यांनी घोषित केले.

संकलन : ॲड. विनोद यशवंतराव भिडे, औरंगाबाद

## माहे जानेवारी ते मार्च २०१८ पर्यंतचे देणगीदार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा | १,०००/- | आजीव सभासद |
| २) | श्री. नरेंद्र जनार्दन भिडे, ठाणे | ९००/- | आजीव (भाग) सभासद |
| ३) | सौ. स्मिता नरेंद्र भिडे, ठाणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ४) | श्रीमती वनिता नरसिंह भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ५) | नीलकमल फडके (भिडे) पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ६) | श्री. प्रसाद प्रसन्नकुमार भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ७) | श्री पुष्कर प्रसन्नकुमार भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ८) | श्री. मधुकर लक्ष्मण भिडे, मालाड | ९००/- | आजीव (भाग) सभासद |
| ९) | श्री. गजानन वसंत भिडे, पुणे | ५,०००/- | देणगी |
| १०) | श्री. सुभाष विनायक भिडे, पुणे | १,०००/- | आजीव सभासद |
| ११) | श्री. सुभाष विनायक भिडे, पुणे | ५,०००/- | देणगी |
| १२) | श्री. शिरीष सुरेश भिडे, यूपी. | १,०००/- | आजीव सभासद |
| १३) | सौ. आकांक्षा आशिष भिडे, नालासोपारा | ५००/- | देणगी |
| १४) | श्री. सुभाष चिंतामण भिडे, सांगली | ५००/- | देणगी |
| १५) | श्री. रामचंद्र महादेव भिडे, निगडी | १०,०००/- | देणगी (पुरस्कार) |
| १६) | श्री. मिलींद भिडे, भिलाई (एम.पी.) | १०,०००/- | देणगी |
| १७) | श्री. शशीकुमार केशव भिडे, पुणे | ५,०००/- | देणगी |
| १८) | श्री. मनोहर यशवंत भिडे, माभळे | ५,०००/- | देणगी |

सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे'चा ततसदृश नावाने काही ग्रुप असतील तर त्या ग्रुपला नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानची अधिकृत मान्यता नाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.

## अभिनंदन



जागृती महिला मंडळाच्या (सातारा) संस्थापिका श्रीमती सुमनताई भिडे यांचा वाढदिवस आणि सहस्रचंद्रदर्शन सोहळा नुकताच सातारा येथे संपन्न झाला. ह्या कार्यक्रमासाठी भिडे प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. प्रशांत व ले.क. सुनिल भिडे ह्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. महिला समिती सदस्य सौ. सुप्रिया भिडे उपस्थित होत्या. श्रीमती सुमनताई भिडे व मंगळागौरीचे खेळ हे समीकरण साताऱ्यासह अवघ्या महाराष्ट्रात सुपरिचित आहे. जागृती मंडळातील सर्व महिलांनी मायेचा, स्नेहाचा धागा दृढ करून त्यांच्यामधील आत्मविश्वास जागविणाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच ह्या सोहळ्याचे आयोजन केले होते. श्रीमती सुमनताई सातारा येथील भिडे कुलसंमेलनामध्ये सक्रिय होत्या. मंगळागौरीच्या खेळांमध्ये जागृती निर्माण केली. ही सामाजिक बांधिलकी त्यांनी निस्वार्थीपणे केली ह्या बद्दल त्यांचे कौतुक करावे तितके तोकडेच आहे. त्यांच्या जिद्दीला आणि कार्याला भिडे प्रतिष्ठानकडून सलाम आणि त्यांना शुभेच्छा !

---

## काळ

केव्हातरी येशील नि मलाही भेटशील
जगापासून दूर मला अलगद उचलून नेशील
तसा तू रोजच भेटतोस एक एक श्वास चोरतोस
जीवनाचे एक एक टप्पे हळूच घेऊन जातोस
मन मात्र तुला स्वीकारताना कचरते, घाबरते,
पण तुझे अस्तित्व तेच फक्त सत्य असते
माहीत आहे मला एक दिवस असा येईल
मनसुद्धा तुला न घाबरता स्वीकारेल
तू आहेस काळ, न थकता, थांबता पळणारा,
प्रत्येकाला भेटणारा, पण कुणाला न आवडणारा !

*- सौ. प्रिती भिडे, पुणे*

*मो. ९९२२९४४०८२*


भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !



# आर. जी. ज्वेलर्स

**चोख सोने-चांदी व अद्ययावत दागिन्यांचे दालन**


पंचमुखी प्लाझा, गाळा नं. १, १४१, सदाशिव पेठ,
श्री पंचमुखी गणेश मंदिरासमोर, सातारा

**प्रोप्रा. राहुल घाडगे**

मो. ९९२२८९९९९८

# बालवैज्ञानिक

रत्नागिरीचा बालवैज्ञानिक चि. सोहम प्रसन्न जोगळेकर (भिडे) याने डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये कर्ला, भाट्ये, शिरगांव साखरतर येथील खाफुटी, जैवविविधता, लोकजीवन, साधन-सुविधा, पर्यटन विकास करण्यासाठी ग्रामस्थांचा सहभाग आणि रोजगाराच्या संधीतून शाश्वत पर्यटन विकास ह्याचा अभ्यास करून खारफुटी नर्सरी, जैवविविधता संग्रहालय, येथील वनस्पतींपासून औषधे आणि त्यावर आधारित स्पा ह्या योजना उत्तमरितीने मंडल्या. चि. सोहम ह्याचे वडील श्री. प्रसन्न ह्यांचे रत्नागिरीमध्ये श्रीकृष्ण औषधालय हे औषधाचे दुकान असून आई सौ. अर्चना ह्यासुद्धा बी.फार्म. असून त्या माहेरच्या भिडे आहेत. दुकानामध्ये त्यांचा सहभाग मोठा आहे. चि. सोहमने ह्या स्पर्धेमध्ये रौप्यपदक मिळविले आहे. रत्नागिरीमध्ये इ. ९ वी मध्ये सध्या शिकत असून अनेक पारितोषिके त्याने मिळविली आहेत. नुकत्याच गुहागर येथे झालेल्या भिडे संमेलनामध्ये सोहमने संस्कृत भाषेत पोवाडा म्हणून उत्स्फूर्त दादही मिळवली होती. चि. सोहमने हे पारितोषिक मिळविले परंतु त्याचा उपयोग कसा आहे हे खाली त्याने थोडक्यात सांगितले आहे. ह्या त्याच्या यशाबद्दल भिडे प्रतिष्ठानकडून हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा !



आज पर्यटन हा एक मोठा व्यवसाय बनला आहे. वाहतुकीच्या उत्तम सोयीसुविधा व खर्च करण्याची असणारी पर्यटकांची तयारी यामुळे हा व्यवसाय चांगलाच वाढला आहे. पण याच वेळेला पर्यटकांची मानसिकता आणि पर्यटन व्यावसायिक यांमधील पर्यावरणाविषयीची उदासीनता यामुळे पर्यटन क्षेत्रांना पोहोचणारी हानी व त्यांची होणारी अवस्था पाहता, शाश्वत पर्यटन ही संकल्पना सगळ्यांना समजणे व त्यांनी ती आत्मसात करणे ही आजची मोठी गरज होऊन बसली आहे.

कोकणात येणारी सर्व माणसे म्हणजेच पर्यटक ही अशीच मानसिकता घेऊन येतात. योग्य सुविधा मिळविण्यासाठी बरेचदा निसर्गाच्या होणाऱ्या ऱ्हासाकडे दुर्लक्ष केले जाणे, येथे नवीन नाही.

रत्नागिरीत अनेक खाड्या आहेत. समुद्र व खाड्या यांच्या एकत्रित आलेल्या परिसरात समृद्ध अशी खारफुटीची वने येथे आहेत. या अधिवासातील जैवविविधता, एकमेकांवर अवलंबून असणारे जैविक व अजैविक घटक आणि त्यातून निर्माण झालेली 'बायोझोन्स' यांचे वेगळेच विश्व येथे विकसित झाले आहे. कांदळवने, स्थानिक मच्छिमार व इतर यांच्या सहजीवनातून ही क्षेत्रे आणखीनच परिपूर्ण झाली आहेत. या क्षेत्रांचा वापर पर्यटनासाठी होऊ शकतो; हे माझ्या लक्षात आले. म्हणून मी कर्ला, साखरतर, शिरगांव व भाट्ये या चार भागांची माझ्या अभ्यासासाठी निवड केली. या प्रत्येक ठिकाणची खरफुटी वने, जैवविविधता, गावातील पर्यटनदृष्ट्या उपलब्ध असलेल्या सुखसोयी स्थानिक पर्यटनस्थळे, ग्रामस्थांची पर्यटनाविषयीची मते, गावातील व्यवसाय, लोककला, संस्कृती या सर्वांचे निरीक्षण केले.

या सर्वांचा सारासार विचार करून मी कर्ला व भाट्ये या दोन ठिकाणी असलेल्या खारफुटीच्या परिक्षेत्रात शाश्वत पर्यटन कसे विकसित करता येईल, याचे विश्लेषण केले आहे. येथील ग्रामस्थांना या पर्यटनातून कायम रोजगार कसा मिळेल, याचा विचार मी केला आहे. असे करत असतानाच त्या ठिकाणच्या जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याचे उपायही मी सुचविले आहेत.

यामध्ये नावीन्यपूर्ण असे पर्यटनाचे काही आराखडे मी तयार केले आहेत. 'खारफुटी जैवसंग्रहालय'ही उभारण्याची कल्पना मी सुचवली आहे. खारफुटी क्षेत्रामध्ये निसर्गाच्या सान्निध्यात 'स्पा' सेंटरसुद्धा विकसित करता येऊ शकते. खारफुटीचे महत्त्व लक्षात घेऊन 'खारफुटीची नर्सरी' करता येऊ शकते. या नर्सरीत खारफुटी रोपांची निर्मिती करून अनेक औषधे व प्रसाधने तयार करता येऊ शकतात, असे माझ्या लक्षात आले आहे. ही औषधे किंवा सौंदर्यप्रसाधने कशी बनविता येतील, याची कृती मी तज्ज्ञांच्या सल्ल्याने येथे दिली आहे. मी ह्या सौंदर्यप्रसाधनांच्या कृती या प्रकल्पात दिल्या आहेत.

मी खारफुटी वनांचा पर्यटनासाठी उपयोग करून घेताना त्यांचे संवर्धन व जोपासना यांकडे विशेष लक्ष दिले आहे. त्या क्षेत्रातील पर्यटनासाठी येणारे पर्यटक येथे पक्षीनिरीक्षण, छायाचित्रण शिबिरे, निसर्गभ्रमण, बॅकवॉटर बोटिंग यांचा आनंद घेतानाच येथील जैवविविधतेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अभ्यास, निरीक्षण करतील, संवर्धन व लागवड उपक्रमात सामील होतील आणि निसर्गाविषयीच्या अनुभवाने समृद्ध होऊन ते अनुभव परत परत घेण्यासाठी या खारफुटी वनांकडे वळतील असा मला विश्वास आहे.

येथे सुचविलेल्या उपाययोजनांमुळे खारफुटी क्षेत्रातील शाश्वत पर्यटनाला चालना मिळून अनेक संस्थांना व ग्रामस्थांना स्वावलंबी बनवता येऊ शकते. ह्या प्रकल्पाचा अभ्यास करताना व तेथील जैवविविधता, निसर्ग व लोकजीवन यांचे निरीक्षण करताना मला या बायोझोन्सच्या महत्त्वाच्या भूमिकेची जाणीव झाली. एक पर्यटक या दृष्टीने विचार करत असताना, निसर्गाचा ऱ्हास होणार नाही यासाठी काय करावे व काय करू नये याची नवी दृष्टी मिळाली. ही माहिती येथे येणाऱ्या पर्यटकांना मिळावी व त्यांनीही हा दृष्टिकोन समोर ठेवून कोकणात व प्रामुख्याने या आमच्या कांदळवनांत यावे यासाठी मी प्रयत्नशील राहीन.

**कै. स्वाती राजेंद्रकुमार भिडे, डोंबिवली ह्यांचे वैद्यकीय खर्चासाठी त्यांचे पती श्री. राजेंद्रकुमार वासुदेव भिडे, डोंबिवली ह्यांना प्रतिष्ठानकडून रु. १०,०००/- आर्थिक मदत देण्यात आली.**

# व्याडेश्वर नित्यपाठ प्रकाशन




**उजवीकडून श्री. अतुल भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. चंद्रकांत भिडे, संमेलन अध्यक्ष श्री. मनोहर भिडे, श्री. कुमार भिडे, श्री. शशीकुमार भिडे आणि श्री. प्रभाकरपंत भिडे**

श्रीव्याडेश्वर नित्यपाठ ह्या पोथीचे प्रकाशन गुहागर भिडे संमेलनामध्ये श्री. मनोहरशेठ भिडे, माभळे ह्यांचे हस्ते झाले. २००८ ची दुसरी कुलवृत्त आवृत्ती संपादनामध्ये अनेक व्यक्तींचा सहभाग असणाऱ्यांपैकी आपले एक कुलबंधू श्री. अतुल आ. भिडे, ठाणे ह्यांचा मोलाचा वाटा आहे. ह्या दुसऱ्या आवृत्तीचे डीटीपी, छपाई, फोटोज इत्यादींबाबत त्यांनी केलेले कार्य बहुमोलाचे आहे. श्री. अतुल ह्यांनी स्वतः ह्या पोथीचे डीटीपी काम केलेले आहे. त्यांनी ही पोथी गुहागर संमेलनामध्ये प्रकाशन करून उपस्थित असणाऱ्या सर्वांना श्रद्धा भेट म्हणून विनामूल्य दिली आहे. आजमितीला ह्या पोथीच्या काही प्रती शिल्लक आहेत. ज्यांना हव्या असतील त्यांनी श्री. दिलीप भिडे, पुणे(९६५७५४१२३६) यांना संपर्क करून घेऊन जाव्यात. श्री. अतुल ह्यांनी ह्या अगोदर सुद्धा एका संमेलनामध्ये श्री. परशुराम, व्याडेश्वर, अंबेजोगाई ह्या आपल्या देवतांच्या फोटोप्रती सर्वांना श्रद्धा भेट म्हणून दिलेल्या आहेत. प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये आपल्या व्यवसायाचा व्याप सांभाळून सुद्धा सक्रिय असतात ही बाब कौतुकास्पद आहे. नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठान श्री. अतुल भिडे यांचे आभारी आहे.

**शिष्यवृत्ती विद्यार्थिनींसाठी ...** भिडे कुलोत्पन्नांपैकी गरजू व हुशार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी 'प्रदीप व डॉ. शीला भिडे शैक्षणिक मदत'मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत/शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. इच्छुकांनी आपले नाव, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्नासह माहिती प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरिता असलेल्या पत्त्यावर त्वरित पाठवावी. सदरहू शिष्यवृत्ती/मदत विनापरतफेडीची आहे ह्याची नोंद घ्यावी.

## नम्र सूचना

**ज्या कुलबंधू, भगिनींनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील व्यक्तींना संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.**

**दिलीप भिडे, पुणे ९६५७५४१२३६** | **ले.क. सुनिल भिडे, पुणे ९६२३०१७४४**

**सौ. संपदा भिडे, मुंबई ९८१९९५१३९१** | **प्रदीप ज. भिडे, डोंबिवली ९८९२५०४०४२**

## आवाहन

**९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील रु. १०० चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केले आहे. त्यामुळे आश्रयदाता रु. १०,०००, हितचिंतक रु. ५,००० आणि आजीव सभासद रु. १,००० हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. जे सभासद रु. १०० भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक रु. ९०० भरून आजीव सभासदत्व घ्यावे. अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान रु. ९०० भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे.**

## शब्द

निशब्द दुनियेत शब्दाचे वरदान
मानवासच आहे ॥१॥
शब्दात कौशल्य आहे
मनामनात रुजण्याचे
शब्दात माधुर्य आहे
नादलुब्ध करण्याचे ॥२॥
शब्दात सामर्थ्य आहे
क्षितिजाला कवेत घेण्याचे ॥३॥
आपण -
बोलायचे म्हणून बोलतो
निरर्थक वायफळ बोलतो ॥४॥
बोलता बोलता संवादाचे
वादात रुपांतर होते ॥५॥
वादात मग संवादाचाच
विसंवाद होतो ॥६॥
वायफळ बडबड म्हणजे
ह्या वरदानाचा दुरुपयोग ॥७॥

*- सुमती भिडे, पुणे*
*०२०-२५४४११६१*

# आजीव सभासदांचे सदस्य क्रमांक

| अ.नं. | नांव | सदस्य क्र. | गावाचे नाव |
|---|---|---|---|
| ११५८ | नारायण वसंतराव भिडे | ८१२५ | जबलपूर |
| ११५९ | सौ. लता नारायण भिडे | ८१२६ | जबलपूर |
| ११६० | सौ. मिताली मंदार भिडे | ८१२७ | रत्नागिरी |
| ११६१ | मृण्मय मंदार भिडे | ८१२८ | रत्नागिरी |
| ११६२ | सौ. सुप्रिया प्रशांत भिडे | ८१२९ | सातारा |
| ११६३ | सौ. जयश्री शशिकुमार भिडे | ८१३० | पुणे |
| ११६४ | विक्रांत दिलीप भिडे | ८१३१ | पुणे |
| ११६५ | सौ. आरती विक्रांत भिडे | ८१३२ | पुणे |
| ११६६ | भार्गवी विक्रांत भिडे | ८१३३ | पुणे |
| ११६७ | सौ. विदुला दीनानाथ भिडे | ८१३४ | भूज |
| ११६८ | सौ. गार्गी आदित्य जोशी | ८१३५ | पनवेल |
| ११६९ | प्रकाश जनार्दन भिडे | ८१३६ | मोंड |
| ११७० | किरण प्रकाश भिडे | ८१३७ | मोंड |
| ११७१ | प्रद्युम्न (राहुल) गोविंद भिडे | ८१३८ | पुणे |
| ११७२ | सौ. गौरी लोमटे (भिडे) | ८१३९ | पुणे |
| ११७३ | श्रीमती अस्मिता प्रवीण भिडे | ८१४० | डिचोली |
| ११७४ | सौ. रोहिणी प्रभाकर भिडे | ८१४१ | पुणे |
| ११७५ | केदार गोविंद भिडे | ८१४२ | संगमेश्वर |
| ११७६ | डॉ. प्रमोद रामकृष्ण भिडे | ८१४३ | डिचोली |
| ११७७ | सौ. सविता सुनिल भिडे | ८१४४ | पुणे |
| ११७८ | सौ. अर्चना प्रसन्न जोगळेकर | ८१४५ | रत्नागिरी |
| ११७९ | सौ. गीता भिडे | ८१४६ | रत्नागिरी |
| ११८० | सौ. वर्षा विलास भिडे | ८१४७ | मालाड |
| ११८१ | विलास राजाराम भिडे | ८१४८ | मालाड |
| ११८२ | प्रभाकर महेश्वर भिडे | ८१४९ | कणकवली |
| ११८३ | सुनिल सुरेश भिडे | ८१५० | पुणे |
| ११८४ | शशिकांत वामन भिडे | २१३२ | पुणे |
| ११८५ | केदार प्रभाकर भिडे | ८१५२ | पुणे |
| ११८६ | सौ. सुनिती विवेक भागवत | ८१५१ | पुणे |
| ११८७ | प्रवीण (पंकज) प्रभाकर भिडे | ८१५३ | पुणे |
| ११८८ | सौ. विद्या चिंतामणी भिडे | ८१५४ | ठाणे |
| ११८९ | ऋता चिंतामणी भिडे | ८१५५ | ठाणे |
| ११९० | वर्षा भिडे | ८१५६ | पुणे |
| ११९१ | प्रमोदिनी भिडे | ८१५७ | पुणे |
| ११९२ | सौ. शालिनी किशोर ठोंबरे | ८१५८ | पुणे |
| ११९३ | अभिषेक सुरेंद्र भिडे | ८१६१ | इंदौर |
| ११९४ | श्रीकांत प्रभाकर भिडे | ८१६० | रोहा |
| ११९५ | नरेंद्र जनार्दज भिडे | ७११२ | ठाणे |
| ११९६ | सौ. स्मिता नरेंद्र भिडे | ८१६२ | ठाणे |
| ११९७ | अनय शुभानन भिडे | ८१६३ | बोरिवली |
| ११९८ | सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे | ८१६४ | घाटकोपर |
| ११९९ | धुंडिराज दत्तात्रेय भिडे | ८१६५ | सोलापूर |
| १२०० | सौ. अर्चना संजय भिडे | ८१६६ | मालाड |
| १२०१ | सौ. वनिता नृसिंह भिडे | ८१६७ | पुणे |
| १२०२ | शंतनू शैलेश भिडे | ८१६८ | सांगली |
| १२०३ | नीलकमल फडके | ८१६९ | पुणे |
| १२०४ | प्रसाद प्रसन्नकुमार भिडे | ८१७० | पुणे |
| १२०५ | पुष्कर प्रसन्नकुमार भिडे | ८१७१ | पुणे |
| १२०६ | आशिष धुंडिराज भिडे | ८१५९ | नालासोपारा |
| १२०७ | सौ. आकांक्षा आशिष भिडे | ८१७२ | नालासोपारा |
| १२०८ | सुभाष विनायक भिडे | ८१७३ | पुणे |
| १२०९ | शिरीष सुरेश भिडे | ८१७४ | पुणे |
| १२१० | डॉ. मीनल महेश भिडे | ८१७५ | पुणे |
| १२११ | अरुण शंकर भिडे | ८१७६ | बोरिवली |
| १२१२ | सौ. मालती मधुसुदन अभ्यंकर | ८१७७ | मालाड |
| १२१३ | प्रसाद प्रमोद भिडे | ८१७८ | पुणे |
| १२१४ | अल्हाद प्रमोद भिडे | ८१७९ | पुणे |


॥ श्री गजानन प्रसन्न ॥

# स्नेहांकुर

राहण्याची उत्तम सोय
एसी/नॉन एसी रुम्स उपलब्ध.

**श्री. गणेश महादेव भिडे**
वरचा पाट, मु. पो. ता. गुहागर,
मो. ९४२११ ३६९६८, ९४०५७ ४७६६८

**मुंबई कार्यालय : सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८.
मो. ९८१९९ ५१३९१

**• पत्रव्यवहारासाठी पत्ता •**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन, ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४



'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'जी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक : प्रफुल्ल डबीर
RNI No. : M-6 (1457)/70-RNI
Reg. No. KLR 136/15-17 Posted in Kolhapur RMS

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'जी'वॉर्ड, कसबा गेट गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०८२७



# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**




Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available


## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**




**Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

**CASTINGS**




Heavy C.I. Castings
Maximum single piece - 2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton